दाखल दिनांक : ०५.१०.२००५.

नोंदणी दिनांक : ०५.१०.२००५.

निकाल दिनांक : ०३.०१.२०१७.

कालावधी : वर्ष महिने दिवस

११ ०२ २९

**<u>३ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कराड यांचे न्यायालयात</u>**

( <u>पीठासीन अधिकारी रा. तु. घोगले</u> )

<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३१४/२००५.</u>

**<u>निशाणी क्र. ____</u>**

१. राजेंद्र बाबासोा माने
वय : ३५, धंदा : व्यापार,
२. संजय बाबासोा माने
वय : ३०, धंदा : शिक्षण,
दोघे रा. मंगळवार पेठ, कराड,
ता. कराड, जि. सातारा. .... **वादी**

—विरुध्द—

१. राजाराम विठू काटकर (मयत)
१अ. अनुसया राजाराम काटकर (मयत)
१ब. प्रताप राजाराम काटकर
वय : सज्ञान वर्षे, धंदा : डॉक्टर,
१क. अंजना राजराम काटकर
वय : सज्ञान वर्षे, धंदा : घरकाम,
क्र. १ब व १क रा. विटा, इंग्लिश स्कूल
समोर, गोकूळ खानावळ जवळ,
ता. खानापूर, जि. सांगली.
१ड. सौ. निला रामचंद्र पाटील
वय : सज्ञान वर्षे, धंदा : घरकाम,
रा. वाठार, ता. कराड, जि. सातारा.

**( नं. १अ ते १ड नि. ३५ अन्वये कमी)**

२. निवृत्ती रामचंद्र पाटील (मयत)

२अ. आनंदराव निवृत्ती पाटील
वय : ५० वर्षे, धंदा : नोकरी,

२ब. लालासोा निवृत्ती पाटील
वय : ४९ वर्षे, धंदा : नोकरी,

२क. आशोक निवृत्ती पाटील
वय : ४८ वर्षे, धंदा : नोकरी,
क्र. २अ ते २क रा. मंगळवार पेठ,
कराड, ता. कराड, जि. सातारा.

२ड. मालन जगन्नाथ मोरे
वय : ४५ वर्षे, धंदा : घरकाम,
रा. कोयना वसाहत (जखिनवाडी)
ता. कराड, जि. सातारा.

३. बाळासोा रामचंद्र जाधव
वय : सज्ञान वर्षे, धंदा : शेती,
रा. मंगळवार पेठ, कराड,
ता. कराड, जि. सातारा. **... प्रतिवादी**

**दावा** – दावा कब्जा मिळणेसाठी व नुकसान भरपाई मिळणेबाबत.

---

श्री. एम. ए. जाधव, अधिवक्ता वादीकरीता.
श्री. एस. एन. चिंगळे अधिवक्ता प्रतिवादींकरीता.

---

## –: **न्यायनिर्णय** :–

( घोषित दिनांक ०३ जानेवारी २०१७ )

०१. वादीने सदरचा दावा वाद मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा व दरम्यानचे व नुकसानीची रक्कम मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादपत्रातील वादकथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे;

गट नं. ४३/१ क्षेत्र ६४ आर, गट नं. ४२/७ क्षेत्र ३६ आर आणि गट नं. ४१/७ क्षेत्र १० आर शेत जमीन मिळकती वादीचे खरेदी मालकीच्या आहेत. सदर मिळकतीच्या पूर्व बाजूस प्रतिवादीचे मालकीचे गट नं. ४३/२ च्या शेत जमीनी आहेत. प्रतिवादीनी गट नं. ४३/१ मिळकतीपैकी पूर्व बाजूकडील ०.०४.५० आर क्षेत्र (यास हयापुढे 'दावा मिळकत' म्हणून संबोधण्यात येईल) अतिक्रमण करून गैरकृत्य केले आहे. वादींनी प्रतिवादींना समविण्याचा प्रयत्न केला परंतू प्रतिवादींनी दाद दिली

नाही. उलट प्रतिवादींनी हद्दीच्या कारणावरून वाद उपस्थित केला, त्यामुळे वादींनी स्वखुशीने दावा कलम १अ, १ब व १क या मिळकतीच्या हद्दी मोजणी अधिकारी यांचेकडून दि. २३/०४/२००४ मोजून घेतल्या. सदर मोजणीप्रमाणे प्रतिवादी नं. २/३ याने दावा कलम १ड अन्वये अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरील अतिक्रमण केलेल्या मिळकतीचा कब्जा देणेबद्दल वादींनी प्रतिवादींकडे वेळोवेळी मागणी केली असता प्रतिवादींनी कब्जा दिलेला नाही. वादींनी प्रतिष्ठीत इसमांची बैठक घेतली सदर बैठकीमध्ये प्रतिवादींनी मोजणी मान्य केली परंतू दावा मिळकतीचा कब्जा देण्यास नाकारले म्हणून वादीने दावा मिळकतीचा कब्जा मिळणेसाठी व सन २००४ चे उत्पन्नाची नुकसानी मागणेसाठी दावा दाखल केलेला आहे.

०३. प्रतिवादी नं. १अ ते १ड यांची नि. ३५ अन्वये नावे कमी करण्यात आली. प्रतिवादी नं. २अ ते २ड यांना दावा समन्सची बजावणी होवून देखील हजर होण्यास असमर्थ ठरले. सबब प्रतिवादी नं. २अ ते २ड तर्फे दाव्याच्या सुनावणीचा एकतर्फा आदेश करण्यात आला.

०४. प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी नि.१७ येथे म्हणणे दाखल करून दाव्यातील विरोधी कथनांचे स्पष्ट शब्दात खंडन केलेले आहे. कथित नंबरचे बांध गेली ५० वर्षापेक्षा अधिक काळापासून जसे आहेत तसे आहेत. वादीनेच सर्वे नं. ४२ व ४३ मध्ये असणारा बांध मनमानीप्रमाणे फेरबदल केला आहे. दि. २३/०४/२००४ रोजी कसलीही मोजणी झालेली नाही. वाद मिळकतीलगत कोठेही हद्दीचा दगड उपलब्ध झाला नसल्यामुळे मोजणी करता येत नाही असे सांगून वादीने मोजणीदाराचे संगनमताने खोटा नकाशा तयार केला आहे व अतिक्रणाच्या खोटया तक्रारी केल्या आहेत. वादी नमुद करतात तो मोजणी नकाशा वस्तूस्थितीप्रमाणे नाही. तो प्रतिवादीला मान्य व कबूल नाही. त्यामुळे वादी नमुद करतात तसे कसलेही अतिक्रमण कोणत्याही प्रतिवादीने व केंव्हाही केलेले नाही. वास्तविक, वादी नमुद करतो की, शेत मिळकत ज्या भागात आहे त्या ठिकाणी नवीन सर्वे नं.५० च्या पूर्व अंगावर गेल्या अनेक वर्षापासून पूर्व पश्चिम जाणारा जो

रस्ता आहे त्यापासून उत्तरेकडे नदीकडे जाणारा रस्ता आहे. त्या नदीकडे जाणा—या रस्त्याची पश्चिम हद्द म्हणजेच सर्व्हे नं. ५० ची पूर्व हद्द निश्चित करूनच पश्चिमेकडे मोजणी केल्या शिवाय संबंधीत धारकाचे क्षेत्र निश्चित ठरवता येणार नाही. त्यामुळे वादी नमुद करतात त्या मोजणी कमी झाली नसल्याने अगर फाळणी अभिलेख उपलब्ध नसल्याने वादी नमुद करतात की, मोजणी खोटी आहे. वादीने दाखल केलेला मोजणीबाबतचा नकाश प्रतिवादींना मान्य नाही. यासर्व कथनावरून दावा नामंजूर करणेची त्यांनी मागणी केलेली आहे.

०५. प्रस्तुतकामी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत. सदरील मुद्दे त्याचे निष्कर्ष व त्यावरील कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नमुद केलेले आहेत.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादी हा दावा मिळकत १ड, १इ व १फ ची मालकी असल्याचे सिध्द करतात काय ? | ... होय. |
| २) | प्रतिवादी नं. २ व ३ यांनी दावा मिळकत १ड मध्ये अतिक्रमण केले हे वादी सिध्द करतात काय ? | ... होय. |
| ३) | वादी हा दावा मिळकत १ड चा ताबा मिळण्यास पात्र आहे काय ? | ... होय. |
| ४) | वादी दरम्यानचे उत्पन्ना मिळण्यास पात्र दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम २० नियम १२ अन्वये चौकशी करावी आहे काय ? | ... होय. |
| ५) | आदेश व हुकूमनामा काय ? | ... दावा मंजूर करणेत येतो. |

## —: कारणमिमांसा :—

मुद्दा क्रं. १ ते ५ बाबत :—

०६. वादी श्री. संजय माने (वा.स.१) यांनी दाव्यात नमूद केलेप्रमाणे तंतोतंत अशी साक्ष नोदविली. प्रतिवादीनी गट नं. ४३/१ मिळकतीपैकी पूर्व

बाजूकडील ०.०४.५० आर क्षेत्र अतिक्रमण करून गैरकृत्य केले आहे. वादींनी प्रतिवादींना समविण्याचा प्रयत्न केला परंतू प्रतिवादींनी दाद दिली नाही. उलट प्रतिवादींनी हद्‌दीच्या कारणावरून वाद उपस्थित केला, त्यामुळे वादींनी स्वखुशीने दावा कलम १अ, १ब व १क या मिळकतीच्या हद्‌दी मोजणी अधिकारी यांचेकडून दि. २३/०४/२००४ मोजून घेतल्या. सदर मोजणीप्रमाणे प्रतिवादी नं. २/३ याने दावा कलम १ड अन्वये अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरील अतिक्रमण केलेल्या मिळकतीचा कब्जा देणेबद्‌दल वादींनी प्रतिवादींकडे वेळोवेळी मागणी केली असता प्रतिवादींनी कब्जा दिलेला नाही.

०७. संजय माने (वा.स.१) यांच्या पुराव्याला पुष्टी देण्यासाठी वादीने सलीम शिकलगार (वा.स.२) याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, त्यांनी दि. २२ व २३/०४/२००४ रोजी प्रत्यक्ष जागेवर जावून गट नं. ४३/१ ची मोजणी केली व हद्‌दीच्या खुणा दाखविल्या. त्याप्रमाणे भूमापन क्र. ४३/२अ यातील प्रतिवादी २, ३ यांनी ०.०४.५० आर क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले. त्याप्रमाणे त्यांनी नकाशा नि. ४४ प्रमाणे केला. यावरून असे सिध्द होते की, प्रस्तूत साक्षीदाराच्या पुराव्यावरून व नकाशा नि. ४४ अन्वये एकच बाब स्पष्ट होते की, प्रतिवादीने दावा मिळकतीत अतिक्रमण केले आहे. परंतू उलटतपासात प्रतिवादीने वादी व त्याच्या साक्षीदारांचे कथन खोडून काढलेले नाही.

०८. तोंडी पुराव्यासोबत वादीने सादर केलेला कागदोपत्री पुरावादेखील लक्षात घेणे गरजेचे आहे. निशाणी क्र. ०८ व ०९ वरील कागदपत्र काळजीपूर्वीक पाहीले असता दावा मिळकतीमध्ये वादीची मालकी व प्रत्यक्षात ताबा आहे. एकंदरीत उपरोक्त सर्व कागदोपत्री पुरावा वादीचेच तोंडी कथनांना पुरेपुर जोड देत असलेचे दिसून येत आहे. या कागदपत्रांविरुध्द जाईल असा कोणताही पुरावा प्रतिवादीतर्फे सादर करणेत आलेला नाही. अर्थात त्यावरुन या कागदपत्रांतील नोदींवर कोणतीही शंका

निर्माण होत नाही. वास्तवीक इव्हिडंस ॲक्टप्रमाणे उपरोक्त कागदपत्रांतील नोंदींबाबत खरेपणाचे गृहितक आहे. सदर गृहितकांविरुध्द जाईल अशी कोणतीही परिस्थिती प्रतिवादीने दर्शवून दिलेली नाही. परिणामत: वादीचे कथनांना तोंडी तथा कागदोपत्री पुराव्याची पुष्टी मिळत आहे.

०९. वादीच्या पुराव्यानंतर प्रतिवादीला अनेकवेळा संधी देण्यात आली. परंतू प्रतिवादी हजर झाले परंतू त्यांनी कोणताही पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे वादीचा पुरावा हा अभेद्य राहीलेला आहे. करिता त्यावर पुर्णत: विश्वास निर्माण होवून तो संपूर्णपणे खरा असल्याचे नाकारता येणार नाही. खटल्यातील एखादा पक्षकार स्वत:ची साक्ष देत नसेल, स्वत :ची बाजू शपथेवर सांगत नसेल व स्वत:स उलटतपास घेण्यास सादर करत नसेल तर अशा परिस्थितीत असे गृहितक समजावे की, त्या पक्षाची बाजू चुकीची आहे व त्या पक्षाविरुध्द तसे भारतीय पुरावा कायदा कलम ११४ अन्वये विरुध्द अनुमान काढावे असा सिध्दांत मा. बॉम्बे उच्च न्यायालयाने '' पिरगोंडा वि. विश्वनाथ (ए. आय. आर. १९५६ बॉम्बे २५९१)'' व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या “विदयाधर विरुध्द माणिकराव (ए. आय. आर. १९९९ एस. सी. १४४१)” या न्याय निवाडयात मांडलेला आहे. या निकालपत्रावर भिस्त ठेवून प्रस्तुत दाव्यातील परिस्थिती पाहिली असता त्यात देखील प्रतिवादीने कोणताही पुरावा नोदविलेला नाही. त्यामुळे प्रतिवादीविरुध्द अनुमान निघत आहे. याउलट वादीची कथने व त्या अनुषंगाने आलेला शपथेवरील पुरावा वादीची बाजू अधिक ठाम करत आहे.

१०. एकंदरीत वादीने सादर केलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याची गोळाबेरीज केली असता वादीच्या कथनामध्ये पूर्णत: तथ्य असल्याचे निष्पन्न होत आहे. वादी याचे कथनाप्रमाणे प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केले आहे हे सिध्द् होते. त्याचप्रमाणे वादीची वाद मिळकतीमध्ये वहिवाट असलेबाबत व प्रतिवादींनी वाद मिळकतीमध्ये अतिक्रमण केले असलेबाबत वादीने साक्षीपुरावा याकामी दिलेला आहे. सदरची बाब खोडून काढण्यासाठी प्रतिवादी स्वत: साक्षी पींज—यात आले नाहीत अथवा त्यांच्या

वतीने इतर कोणही साक्षीदार तपासुन वादीच्या दाव्याला आव्हान दिले नाही. त्यामुळे वादीने दिलेला पुरावा ग्राहय धरुन वादीने त्याचा दावा सिध्द केला आहे असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही. सबब मुद्या क्र.१ ते ४ निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ५ करिता खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

०१) दावा मंजुर करण्यात येतो.

०२) प्रतिवादी नं. २अ ते २ड व प्रतिवादी नं.३ यांनी अतिक्रमित केलेली दावा मिळकती १ड चा प्रत्यक्ष कब्जा वादींना दावा निकाल तारखेपासून दोन महिन्याच्या आत द्यावा.

०३) वादी हे दरम्यानच्या लाभास पात्र आहेत. त्याबाबतची चौकशी दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम २० नियम १२ अन्वये करावी.

०४) उभयपक्षांनी दाव्याचा खर्च आपला आपणच सोसण्याचा आहे.

०५) येणेप्रमाणे हुकुमनामा करण्यात यावा.

कराड.
दिनांक: ०३/०१/२०१७

(राजेंद्र तु. घोगले)
३ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
कराड.